संपादकीय

मोदी आणि आंबेडकरी चळवळीचे उद्दिष्ट समान असू शकते ?

काँग्रेसमुक्त भारत

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भाजपला 'काँग्रेसजनमय ' करत काँग्रेसचे नामोनिशाण मिटवून एकपक्षीय लोकशाहीकडे म्हणजे हुकुमशाहीकडे देशाला घेवून निघाले आहेत. त्यांच्या विधिनिषेधशून्य आणि बेलगाम राजकारणाला, मनसुब्यांना आपला हातभार का लागू द्यायचा, याचा विचार महाराष्ट्रातील जनतेने विशेषत: दलित, बौद्ध, मागास, आदिवासी,बहुजन आणि अल्पसंख्यांक या समाजांनी करण्याची गरज आहे.

लोकसभेच्या सर्वाधिक म्हणजे ८० जागा असलेल्या उत्तर प्रदेशनंतर ४८ जागा असलेले महाराष्ट्र हे राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यातील ४८ पैकी २४ जागांवरील मतदान गेल्या महिन्यात १९ , २६ एप्रिल आणि ७ मे रोजी तीन टप्प्यांत पार पडले आहे. आता उरलेल्या निम्म्या म्हणजे २४ जागांवरील मतदान दोन टप्प्यांत १३ आणि २० मे रोजी होणार आहे. चौथ्या टप्प्यात ११ तर पाचव्या टप्प्यात १३ मतदारसंघ आहेत. अखेरच्या पाचव्या टप्प्यात बहुतांश जागांवर उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शिंदे सेना यांच्यात लढत होणार आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे पती परकाला प्रभाकर हे प्रख्यात अर्थतज्ज्ञ आणि राजकीय विश्लेषक आहेत. त्यांनी तर ' ही लोकसभा निवडणूक जिंकून मोदी पुन्हा सत्तेवर आले तर देशात नंतर कधीही निवडणूक पार पडणार नाही !' असा धोक्याचा इशाराच दिलेला आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक ही भाजप विरुद्ध भारतीय अशी बनली आहे. त्यात बौद्ध - आंबेडकरी समाजही आला. मात्र त्या समाजासाठीही भाजप आता ' अस्पृश्य ' राहिलेला नाही. काही रिपब्लिकन नेते भाजप उमेदवारांच्या दारोदारी फिरत आहेत. तर, काही जण भाजपला मोठ्या मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन प्रचार सभांमधून करत आहेत. त्या निमित्ताने खालील तीन प्रश्न.

* गांधीजी हे एकाचवेळी भाजप - संघ परिवार आणि आंबेडकरी चळवळ यांचे समान शत्रू असू शकतात काय ?

* ' दलित ' शब्द हटवा ! यावर भाजप सरकार आणि आंबेडकरी समाज यांची एकाचवेळी समान भूमिका कशी असू शकते ?

*' काँग्रेसमुक्त भारत ' हे मोदी आणि आंबेडकरी चळवळीचेही एकाचवेळी समान उद्दिष्ट बनू शकते काय ?

संघ परिवार आणि आंबेडकरवाद या दोन विचारधारा पूर्णत: भिन्न आणि परस्परविरोधी आहेत. कुठल्याही अंगाने त्यात ' समविचार ' नाही. त्यामुळे

वरील तिन्ही प्रश्नांवर उत्तर नकारार्थीच मिळणार, यात तिळमात्र शंका नाही. असो.

यावेळच्या लोकसभा निवडणुकीत संविधान आणि लोकशाहीच्या अस्तित्वाचा, भवितव्याचा प्रश्न देशासमोर उभा ठाकला आहे. त्यामुळे एका राजकीय अपरिहार्यतेतून सत्तेसाठीची सौदेबाजी गौण मानून बौध्द - दलित - मुस्लिम आदी अल्पसंख्यांक समाज हे देशभरात इंडिया आघाडीला आणि राज्यात महाविकास आघाडीला साथ देताना दिसत आहेत. या संदर्भात विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि इतर प्रांतांतून शेकडो आंबेडकरवादी विचारवंत, माजी सनदी अधिकारी, वकिल, साहित्यिक, कलावंत यांनी केलेल्या आवाहनाला राज्यभरातून दांडगा पाठिंबा मिळाला आहे.

वास्तविक दलितांना काँग्रेसच्या प्रेमाचा भारी उमाळा यावा, असा त्या पक्षाचा इतिहास आणि राजकीय वर्तन नाही, हे कुणीही मान्यच करेल . तरीही काँग्रेस हा पक्ष उदारमतवादी आणि सर्वसमावेशक आहे, हे नाकारता येत नाही. तसेच महाविकास आघाडीला राज्यात शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांचा आश्वासक चेहरा लाभलेला आहे. ही गोष्ट त्या आघाडीसाठी जमेची बाजू ठरली आहे. त्यामुळेच त्या आघाडीने सर्व थरांतील आंबेडकरवादी कार्यकर्त्यांच्या घेतलेल्या एका मेळाव्याला शिवसेना भवनात पहिल्यांदाच अलोट गर्दी झाल्याचे चित्र दिसून आले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली घडलेले हे परिवर्तन आहे.

गेल्या वर्षी उद्धव ठाकरे हे दादरच्या डॉ. आंबेडकर भवनात गेले होते. त्यानंतर आंबेडकरी कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवसेना भवनात एकत्र येण्याची ही घटना ऐतिहासिक म्हणावी लागेल. कारण त्यावेळी शिवसेना भवन जयभीम... जय संविधान या घोषणांनी दुमदुमले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून आपल्याला लोकशाही दिली हे खरे. पण त्यावेळी समोर असलेली देशातील विसंगतीने भरलेली परिस्थिती पाहता लोकशाहीच्या भवितव्याबद्दल ते कमालीचे साशंक आणि चिंताग्रस्त होते. त्यामुळे धम्म क्रांतीद्वारे आपल्या पश्चात लोकशाहीच्या रक्षणासाठी ' स्पेशल टास्क फोर्स ' उभा करूनच त्यांनी अखेरचा श्वास घेतला होता!

संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय या मूल्यांची जोपासना - जपणूक करण्यासाठी त्याला अनुरूप अशी देशातील लोकांची मानसिकता घडविण्याची त्यांना नितांत गरज वाटत होती. त्यादृष्टीने लाखो दलितांना त्यांनी तथागताच्या मुक्तीपथावर नेवून ठेवले. अन् देशाच्या लोकशाहीच्या भविष्याबद्दल स्वत:ला वाटणारी भ्रांत बाबासाहेबांनी मिटवली होती. त्या पार्श्वभूमीवर यावेळची लोकसभा निवडणूक ही बौद्ध समाजाच्या राजकीय प्रबुद्धपणाची कसोटी घेणारी ठरली आहे.

खरे तर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ' रिपब्लिकन ' ही संकल्पना म्हणजे प्रजासत्ताक भारतातील नागरिकांना दिलेली नवी ओळख आहे. पण त्यांचा रिपब्लिकन पक्ष हा यावेळी निवडणूक प्रक्रियेतून साफ बाहेर फेकला गेला आहे.

निवडणूक रिंगणात दिसत आहेत ते सारे बहुजनवादी पक्ष आहेत. तर दुसरीकडे, भाजप उमेदवारांच्यापाठी फिरणाऱ्या कथित आंबेडकरवादी नेत्यांची मांदियाळी पाहता मोदी आणि भाजप यांच्याविरोधात आंबेडकरी चळवळीत कोणी शिल्लक आहे काय, असा प्रश्न पडतो. अर्थात, हा प्रश्न बौद्ध समाजाला मुळीच लागू पडत नाही, हे इथे आवर्जून नमूद करावे लागेल.

लोकसभा निवडणुकीपूर्वीचे चित्र वेगळे आणि नेमके उलट होते. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडी या पक्षाने वर्षभर आधीच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशी युती केली होती. त्यामुळे उद्धव ठाकरे - शरद पवार - राहुल गांधी यांच्या महाविकास आघाडीत ' वंचित ' चा प्रवेश सर्वांनीच गृहीत धरला होता. दुसरीकडे, बामसेफ - भारत मुक्ती मोर्चाचे नेते वामन मेश्राम हे शरद पवार यांच्यासोबत जाहीर सभांमधून सतत दिसत होते. त्याचवेळी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी या पक्षाचे नेते डॉ. सुरेश माने काँग्रेससोबत बोलणी करताना दिसत होते. पण त्यापैकी कुणाचीही महाविकास आघाडीशी जागा वाटपावर सहमती - एकमत झाले नाही. त्यामुळे ते सारे नेते स्वबळावर निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यात नेहमीच ' एकला चलो रे ' ची भूमिका बजावणाऱ्या मायावती यांच्या बहुजन समाज पार्टीचीही भर पडली आहे. मात्र त्यांच्यातील वंचित बहुजन आघाडी हा पक्ष लोकसभेच्या सर्वाधिक म्हणजे सुमारे ४० जागांवर लढत आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर, मायावती, डॉ. सुरेश माने, वामन मेश्राम हे चारही नेते बहुजनवादी आणि भाजपविरोधी आहेत हे विशेष. त्याचा अर्थ ते चौघेही एकाच आणि समान व्होट बँकेचे दावेदार आणि भागीदार आहेत. वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टी, भारत मुक्ती मोर्चा, बहुजन रिपब्लिकन सोशालीस्ट पार्टी या पक्षांना निवडणूक लढवण्याचे स्वातंत्र्य आणि अधिकार जरूर आहे. राजकीय पक्षांना नोंदणी कायम राखण्यासाठी, पक्षाला मान्यता मिळवण्यासाठी निवडणुका लढवणे भाग असते. हे लक्षात घेता त्या चारही पक्षांची लढाई ही पक्षीय अस्तित्वासाठी ठरते. आपले उमेदवार निवडून आणणे, भाजपला एकट्याने पराभूत करणे हे उद्दिष्ट त्यांच्यासाठी आज तरी आवाक्यातले दिसत नाही. महाराष्ट्रात अनेक रंगी लढती होत असल्या तरी मुख्य लढत भाजपची महायुती आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि राहुल गांधी यांच्या काँग्रेसची महाविकास आघाडी यांच्यातच आहे. अशावेळी चारही बहुजनवादी पक्षांच्या विभक्त आणि स्वबळावरच्या लढती कुणाला तारक, कुणाला मारक ठरणार असा प्रश्न सध्या राज्यात सर्वत्र चर्चिला जात आहे. त्यावर ' दलितांचे , बहुजनांचे स्वतंत्र राजकारण उभे करायचे नाही काय? असा सवाल ते बहुजनवादी नेते करतात.

त्यांचा तो सवाल चुकीचा मुळीच नाही. पण आपला जनाधार आणि मतांच्या शक्तीला असलेल्या मर्यादांचे वास्तव लक्षात घेवून साक्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी यशासाठी दिलेला राजकीय मंत्र दुर्लक्षित का करायचा? सातत्याने पराभव - अपयश पदरी पडत असतानाही स्वबळावर लढून आणखी किती दशके वाया घालवायची, कार्यकर्त्यांचा शक्तिपात करत राहायचे? अख्खे आयुष्य केवळ उपद्रव मूल्य दाखवून देण्यात घालवायचे हे कसले आलेय राजकारण? हा आजघडीला खरा प्रश्न आहे.

- दिवाकर शेजवळ

भर पावसात अजित पवार यांची सभा

डॉ. अमोल कोल्हेंच्या उमेदवारीबाबत मागितली माफी

पिंपरी : अवकाळी पावसाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या चाकणमधील सभेला फटका बसला. पावसामुळे सभेला आलेले नागरिक परत गेले. पण, पावसातही डोक्यावर खुर्च्या घेऊन थांबलेल्या नागरिकांसमोर पवार यांनी भाषण केले. गेल्या वेळी डॉ. अमोल कोल्हे यांना उमेदवारी देऊन चूक केली. मला माफ करा, असेही ते म्हणाले.

शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव-पाटील यांच्या प्रचाराची सांगता पवार यांच्या सभेने चाकण येथे झाली. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिलाध्यक्षा रुपाली चाकणकर, भाजपचे विधान परिषदेचे गटनेते प्रवीण दरेकर, आमदार दिलीप मोहिते, अमोल मिटकरी या वेळी उपस्थित होते. चाकण परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे नागरिक सभेला येऊ शकले नाहीत. पावसामुळे अनेक जण परत गेले.

पवार म्हणाले, की छत्रपती संभाजी महाराज, हुतात्मा राजगुरू यांचे स्मारक अजित पवार यांनी का केले नाही असे विरोधक म्हणतात. मग, काही जण चार-चार वेळा मुख्यमंत्री झाले. त्यांच्याही काळात स्मारक का झाले नाही, त्यांना दोष का देत नाहीत? मी खपवून घेणार नाही. सरळ आहे, तोपर्यंत ठीक; वाकड्यात शिरलो, तर बंदोबस्त केल्याशिवाय गप्प बसणार नाही, असा इशारा त्यांनी डॉ. अमोल कोल्हे यांना दिला.

प्रत्येकाचा आदर करतो. चांगले असाल म्हणूनच निवडून आणले. पण, तुम्ही मतदारसंघातील लोकांकडे पाठ फिरविली. खेडमध्ये भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना एकमेकांविरोधात लढलो आहोत. गावचे राजकारण येथे आणू नका. भांड्याला भांडे लागले असेल, पण ताणून धरू नका. झाले गेले गंगेला मिळाले. देशाचे भवितव्य ठरवणारी निवडणूक आहे. त्यामुळे महायुतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी खेड तालुक्यातून मताधिक्य दिले पाहिजे. दिवसा, रात्री घड्याळाचेच काम करावे. गडबड करू नका, असेही पवार यांनी कार्यकर्त्यांना सुनावले.

१३ तारखेला विरोधकांचे बारा वाजणार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा इशारा

पुणे: महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्यासाठी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रोड-शो करत प्रचार केला. तेरा तारखेला विरोधकांचे बारा वाजवणार अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर केली आहे. शहरातील चाफेकर चौकातून या रॅलीची सुरुवात झाली. साडेतीन ते चार तास चाललेल्या रॅलीमध्ये नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

एकनाथ शिंदे म्हणाले, महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे हे हॅट्रिक नक्की करतील. बारणे यांना मोठा प्रतिसाद असल्याचे पाहायला मिळते.

अबकी बार आप्पा तिसरी बार खासदार अशी घोषणा एकनाथ शिंदे यांनी दिली. मावळमध्ये ७५ ते ८० टक्के मतदान झाल्यास तुम्हाला मंत्रिपद देऊ असे यावेळी शिंदे म्हणाले.

महाराष्ट्रात तिन्ही टप्प्यामध्ये महायुती सर्वात पुढे असून ४५ पार जागांवर जिंकणार असल्याचा विश्वास, एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. महिलांनी १३ तारखेला मतदानामध्ये सहभागी व्हावं, त्याचबरोबर कुटुंबातील व्यक्तींना मतदानासाठी पाठवावं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत आणि विधान सभेत महिलांना आरक्षण दिलं आहे. आगामी निवडणुकांमध्ये संसदेत आणि विधानसभेत महिला दिसतील, असंही शिंदे म्हणाले.

खेड तालुका ज्येष्ठ नागरिक संघाची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध

राजगुरुनगर (वा.) : खेड तालुका ज्येष्ठ नागरिक संघाच्या विश्वस्तांची सन २०२४ ते २०२९ या कालावधीची निवडणूक मा.धर्मादाय आयुक्त पुणे यांच्या आदेशाने नुकतीच होऊन एकूण १९ विश्वस्त बिनविरोध निवडून आले असून विश्वस्तांच्या झालेल्या विशेष सभेत अध्यक्ष म्हणून मधुकर खेडकर, उपाध्यक्ष बाळासाहेब गवते, सचिव एकनाथ वाळुंज,सल्लागार शंकरराव गाढवे, हिरामण पडवळ तर खजिनदार पदी अनंत (भाऊ) भालेकर यांची

सर्वानुमते निवड करण्यात आली.

खेड तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यक्षेत्र संपूर्ण खेड तालुका असून सदर संघाचे तालुक्यात १२२२ आजीव सभासद असून संघ ज्येष्ठ नागरिकांचे सर्व प्रकारचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच अग्रेसर आहे.

गैरसमजुतीतून दोन भिक्षेकर्यांना जमावाची मारहाण

कोल्हापूर : भगवी वेशभूषा परिधान करून भिक्षा मागणाऱ्या दोघा भिक्षेकर्यांना लहान मुले पळवून नेत असल्याच्या गैरसमजुतीतून पकडण्याचा प्रकार आज दुपारी साडेबारा वाजता लॉ कॉलेज चौकात घडला. शाहूपुरी पोलिसांनी त्या दोघा भिक्षेकर्यांना पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता हा सगळा प्रकार गैरसमजुतीतून घडला असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले.

राजारामपुरी पाचवी गल्ली परिसरात राहणारा एक तेरा वर्षीय मुलगा दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास लॉ कॉलेज चौकात आपल्या मित्राच्या दुकानात बसला होता. यावेळी या परिसरातून भगवी वस्त्र परिधान केलेले दोन भिक्षेकरी चालले होते. यावेळी या परिसरातील रिक्षा व्यवसायिक मनोहर इंगवले यांना हे भिक्षेकरी मुलांना पळवून नेत असल्याचा संशय आला. यातून त्यांनी आरडाओरड केल्यानंतर या ठिकाणी मोठा जमाव जमा झाला. जमावाने या दोन भिक्षेकर्यांना पकडून ठेवले होते. याची माहिती मिळताच पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी संशयित दोन भिक्षेकर्यांना पोलीस ठाण्यात घेऊन आले.

मगरीच्यावर हल्ला दुर्दैवी मृत्यू

कुरुंदवाड : सदलगा शहर परिसरातील कंटी म्हणून परिचित असलेल्या भागातील दूधगंगा नदीच्या पात्रातील एका बलवान मगरीने शहरातील महादेव खुरे नामक एका बहात्तर वर्षीय वृद्धाला नदीत पोहण्यासाठी उतरले असता हल्ला करून ओढून नेल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

मगरीच्या हल्ल्यात मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव महादेव पुन्नाप्पा खुरे (वय ७२ वर्षे) असे असून ते शेतकरी होते.

शहरातील सामाजिक कार्यकर्ते आणि आपत्कालीन प्रसंगी मदत करणारे, श्री सुकुमार उगारे आणि त्यांच्या सहकार्याने नदीपात्रातील महादेव खुरे यांचा मृतदेह शोधून नदीपात्राबाहेर काढले.

शुक्रवार दि. १० में रोजी दुपारी महादेव खुरे येथील कंटी भागात आपल्या शेतात काम करुन संपूर्ण शरीर घामाने भिजल्याने व कंबर दुखत असल्यामुळे पोहल्याने दुखणे कमी होते या समजूतीने ते नदीपात्रात पोहून काठाकडे येत असताना त्यांच्या पायाला मगरीने धरुन ओढत नेले. असे तेथील जमलेल्या जनतेतून समजले.

आज सकाळी प्रधाने यांच्या शेताजवळ नदीपात्रातून सुकुमार उगारे यांनी महादेव खुरे यांचा मृतदेह अनेक ठिकाणी शोधाशोध करून अत्यंत कष्टाने बाहेर काढला. महादेव खुरे यांच्या डाव्या मांडीवर मगरीच्या चाव्याचे व्रण दिसून आले. महादेव खुरे यांच्या पश्चात पत्नी , दोन मुले असा परिवार आहे. सदलगा पोलिसांत या घटनेची नोंद झाली असून, संबंधित मृत्त व्यक्तीची उत्तरीय तपासणी करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदलगा परिसरात दूधगंगेच्या नदी पात्रात मगरींनी अलीकडे उच्छाद मांडला आहे. शेतकरी वर्गाने नदी किनाऱ्यावरील मोटार पंप सुरू करावयास जाण्याची धास्ती घेतली असून, सर्व शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे. आणि शेतकरी वर्ग भयभीत झाला आहे. यापूर्वीही दूधगंगा नदीतील वास्तव्यास असणाऱ्या मगरीने शेळ्या, मेंढ्या, कुत्री, म्हैशी, घोडे ,इत्यादीवर प्राण घातक हल्ला करून त्यांचा जीव घेतला आहे .निदान मनुष्यहानी झाल्यानंतर तरी वनविभाग याकडे लक्ष देणार आहे का? असा प्रश्न सदलगा या शहरातील नदीकिनाऱ्यावरील शेतकरी वर्गाला पडला आहे

दररोज शेकडो प्रवाशांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचे वितरण

नागपूर : सेवाभावी व्यक्ती आणि स्वयंसेवी संघटनांच्या मदतीने रेल्वे प्रशासनाने प्रवाशांसाठी एक स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. त्यानुसार,नागपूरविभागातील विविध रेल्वे स्थानकांवर दररोज सुमारे दोन हजारांवर रेल्वे प्रवाशांना पिण्याचे शुद्ध आणि थंड पाणी मोफत उपलब्ध करून दिले जात आहे.

उन्हाळ्यात दरवर्षी रेल्वेगाड्यांमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी वाढते. उन्हाचा तडाखा आणि प्रचंड गर्दीमुळे शरीरातून घामाच्या धारा निघतात. उकाड्यामुळे शरीराला थोड्या थोड्या वेळेनंतर पाण्याची गरज भासते. मात्र, प्रत्येकच प्रवाशी खास करून ज्येष्ठ नागरिक, गाडीच्या खाली उतरून स्टॉलवर किंवा नळावर जाऊन पाणी घेऊ शकत नाही. अनेक जण पाण्याची बाटली विकत घेऊ शकत नाही. ते ध्यानात घेऊन त्यांना पिण्याचे शुद्ध आणि थंड पाणी मोफत उपलब्ध करून देण्याची योजना मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक अमन मित्तल यांनी मांडली होती. त्यानुसार, ठिकठिकाणच्या सेवाभावी व्यक्ती आणि संस्थांना आवाहन करण्यात आले. त्याला अनेकांनी दाद दिली. त्यातून १४ एप्रिल २०२४ पासून प्रवाशांना मोफत पिण्याचे पाणी मोफत उपलब्ध करून देण्यात आले. नागपूर विभागातील नागपूर, बल्लारशाह, सेवाग्राम आणि आमला यासह अनेक रेल्वे स्थानकांवर हा उपक्रम राबविला जात आहे.

ब्राम्हण समाजासह मंडळांची नाराजी, २६ माजी नगरसेवकांचा अलिप्तपणा भाजपला भोवणार!

पुणे लोकसभा मतदारसंघ निवडणुकीच्या मतदानाला जेमतेम एक दिवसाचा कालावधी राहिलेला असताना भाजपपुढे मोठा पेच निर्माण झाला आहे. नाराज २६ माजी नगरसेवकांची मनधरणी अद्यापही यशस्वी झालेली नाही. तोच कोथरूड मतदारसंघात जो भाजपचा बालेकिल्ला आहे, तिथे उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या सभेला उमेदवाराने दांडी मारल्याने ब्राम्हण समाजात मोठी नाराजी पसरली आहे. त्यात शुक्रवारी प्रचाराचे नियोजन फिस्कटल्याने पेठांमधील काही मंडळांच्या नियोजित भेटीगाठीकडेच उमेदवाराने पाठ फिरवल्याने आता त्या मंडळांनीही फारकत घेतली आहे. परिणामी भाजपचा बालेकिल्ल्याचा बुरुज ढासळतो की काय अशी भीती राजकीय तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ हे संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढत आहेत.मात्र त्यात सुसूत्रता नसल्याने त्याचा फटका त्यांनाच बसण्याची चिन्हे आहेत. विशेषत: हक्काच्या कोथरूड विधानसभा मतदारसंघात ब्राम्हण समाजाच्या पुढाकाराने मोहोळ यांच्या प्रचारार्थ एका सभेचे आयोजन केले होते. त्याला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती मात्र फडणवीस असूनही मोहोळ यांनी सभेकडे पाठ फिरवल्याने ब्राम्हण समाजात मोठी नाराजी पसरली आहे. त्यात मागील वेळी आम्हालाच 'पाण्या' त पाहणारे उद्या कोणता पवित्रा घेतील अशी कुजबुजही सुरु झाली आहे. त्यासाठी मागील काही घटनांचे उदाहरण देताना बाहेरचा उमेदवार लादून विद्यमान खासदार मेधा कुलकर्णी यांचा मतदारसंघ ताब्यात घेतला. शिवाय त्यांच्यावर मोठ्याप्रमाणावर टीकाही केली.त्या टीका करताना अप्रत्यक्ष समाजालाच लक्ष्य केले. आता सभेला का नाही आले इथपासून चर्चेचा फड रंगत असून जुन्या वादांना उजाळा दिला जात असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे पक्षातच जवळपास २६ माजी नगरसेवक नाराज आहेत. जे काँग्रेस व राष्ट्रवादीतून भाजपमध्ये आले होते. त्यांनी आम्हाला पाच वर्षात काय दिले असा सवाल करून अलिप्तवादी धोरण पत्करले आहे. परिणामी त्याचा फायदा हा महाविकास आघाडीच्या उमेदवारालाच होणार असल्याचे निरीक्षण राजकीय अभ्यासकांचे आहे. शिवाय गत लोकसभा निवडणुकीत स्व. गिरीश बापट यांना कोथरूड या भाजपच्या पारंपरिक बालेकिल्ल्यातून एक लाख ४८ हजार ५७० मते मिळाली होती तर मोहन जोशी यांना ४२ हजार ३७४ मते मिळाली. कोथरूडमधून स्व. गिरीश बापट यांना एक लाख सहा हजार १९६ मतांचे मताधिक्य मिळाले होते. हे बापट यांना मिळालेले सर्वाधिक मताधिक्य होते.पण विधानसभा निवडणुकीत मनसेचे किशोर शिंदे यांना ८० हजार मते मिळाली मात्र विद्यमान आमदार चंद्रकांत पाटील यांना २५ हजार ४९५ चे मताधिक्य मिळाले.हाच फरक महत्वाचा आहे.याकडेही ते लक्ष वेधत आहेत. यंदा या मतदारसंघात ४ लाख १० हजार ६३४ मतदारसंख्या आहे. त्यामुळे काँग्रेसला पडलेली ४२ हजार ३७४ मते आणि शिवसेनेची ३५ हजार मते तसेच घटक पक्षातील अन्य मतांचे समीकरण हे महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या पथ्यावर पडणार असल्याचा दावाही राजकीय अभ्यासकांचा आहे.त्यामुळे निकाल लागल्यावर कोथरूडमध्ये हक्काचे मतदारांनी का पाठ फिरवली हा मुद्दा चर्चेत येईल असेही राजकीय अभ्यासकांचे मत आहे . शुक्रवारी प्रचाराच्या धामधुमीत मनसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते.

त्या सभेला मोहोळ उपस्थित राहिले मात्र भाजपमधील स्थानिक मंडळींच्या अंतर्गत राजकारणाचा फटका पेठांमधील काही मंडळांच्या माध्यमातून बसणार आहे. जोगेश्वरी मंदिर परिसरात येणाऱ्या मोहोळ यांच्या नियोजित कार्यक्रमानुसार काही मंडळांनी जल्लोषात स्वागताची तयारी केली होती. मात्र भाजपमधील स्थानिक कार्यकर्त्यांच्या राजकारणाने मोहोळ यांनाच फसवले आणि थेट राज ठाकरे यांच्या सभेकडे ताफा वळवला. परिणामी ज्या मंडळांनी स्वागताची तयार केली होती. त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला.विशेष म्हणजे कट्टर भाजपचे कार्यकर्तेही त्या त्या मंडळात आहेत. त्यांचे चेहरेच पडले. मात्र दीड - दोन हजार एक गठ्ठा मते असलेल्या त्या मंडळाने आता अलिप्तपणा हे स्वीकारल्याचे सांगताच भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी धावाधाव करून समजूत काढण्याचा प्रयत्न चालवला असला तरी इथून पुढे भाजपचे कुणीही इथे येणार नाहीत अशी संतप्त भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्याने पेठांचा मध्यवर्ती भाग महायुतीला अडचणीत आणणारा असाच ठरणार असल्याची वस्तुस्थिती आहे.त्यात राज्यातील सत्तेचा विचित्र प्रयोग हा मतदारांच्या पचनी पडलेला नाही, या पार्श्वभूमीवर भाजपला मतदानाचा टक्का वाढविण्याकडे भर द्यावा लागणार आहे. मात्र २६ माजी नगरसेवकांचे अलिप्तवादाची भूमिका, ब्राम्हण समाजाची नाराजी, नाराज मंडळांची भूमिका काय आणि मतदानाला जोडून येणाऱ्या रविवार सुट्टीचा दिवस पाहता भाजपसमोर मोठा पेच निर्माण झाला असला तरी मतदानातून 'कोथरूड 'मध्ये हक्काचे मतदार गृहीत धरणे महागात पडते का ? मध्यवर्ती पेठांमध्ये पुन्हा 'कसब्या'ची पुनरावृत्ती होते का ? मंडळांची भूमिका निर्णायक ठरते का ? हेच पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

- प्रवीण पगारे

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99